# विवाहसंस्कार

## शास्त्र आणि सध्याच्या अयोग्य प्रथा

## अनुक्रमणिका

(काही वैशिष्ट्यपूर्ण सूत्रे '*' या चिन्हाने दर्शवली आहेत.)


| | |
|---|---|
| – मनोगत | ६ |
| – प्रस्तूत लघुग्रंथाविषयी मिळालेले दिव्य ज्ञान | ८ |
| १. विवाहाचा अर्थ | १० |
| २. विवाहसंस्काराचे महत्त्व | १० |
| ३. विवाह कितव्या वर्षी करावा ? | १२ |
| ४. नोंदणी विवाहापेक्षा धार्मिक पद्धतीने केलेलाविवाह का श्रेयस्कर आहे ? | १२ |
| ५. विवाह ठरवतांना जन्मकुंडल्या पहाणे | १९ |
| ६. लग्नपत्रिका सात्त्विक कशी असावी ? | २० |
| ७. वधू-वरांचा वेश कसा असावा ? | २४ |
| ८. वाग्दान (वाङ्निश्चय) | २७ |
| ९. विवाहदिनी केले जाणारे काही विधी / कृती | २८ |
| १०. विवाहाशी संबंधित काही कृती | ४७ |
| * पती-पत्नी यांनी नमस्कार कसा करावा ? | ४८ |
| ११. विवाह सोहळ्याच्या संदर्भात काय टाळावे ? | ५० |
| * विवाहाचे भोजन तामसिक किंवा पाश्चात्त्य पद्धतीचे ठेवू नका ! | ५५ |
| * पैशांची उधळपट्टी करू नका ! | ५६ |
| १२. विवाह सोहळ्यातील प्रत्येक कृतीचे अध्यात्मीकरण करा ! | ५७ |
| १३. कार्य पूर्ण झाल्यावर कृतज्ञता व्यक्त करा ! | ६१ |
| १४. शास्त्रानुसार विवाह झाल्यावर उपस्थितांनी व्यक्त केलेल्या प्रतिक्रिया | ६२ |
| १५. विवाहसंस्काराच्या उद्देशालाच हरताळ फासणारे शासन अन् न्यायसंस्था ! | ६४ |

# मनोगत

जीवनात घडणाऱ्या प्रमुख सोळा प्रसंगी ईश्वराच्या जवळ जाण्यासाठी करावयाचे संस्कार हिंदु धर्माने सांगितले आहेत. त्यांतील सर्वांत महत्त्वाचा 'विवाहसंस्कार' ! महागड्या लग्नपत्रिका, ऊंची वेशभूषा, भव्य विवाह कार्यालय, 'बँड', आतषबाजी, कर्णकर्कश संगीत, झगमगाट, जेवणाचा थाटमाट इत्यादी गोष्टी असलेला विवाह म्हणजे 'चांगला विवाह', अशी चुकीची धारणा सध्या समाजात निर्माण झाली आहे. या सर्व धामधुमीत विवाहातील धार्मिक विधी शास्त्रशुद्ध करण्याकडे मात्र दुर्लक्ष होत आहे. विवाहाचा खरा उद्देश म्हणजे, दोन जिवांचे भावी जीवन एकमेकांना पूरक अन् सुखी होण्यासाठी ईश्वराचा आशीर्वाद प्राप्त करून घेणे ! यासाठी विवाहविधी धर्मशास्त्रात सांगितल्याप्रमाणेच करणे अत्यावश्यक असते. यासाठीच या लघुग्रंथात विवाहातील धार्मिक विधींमागील शास्त्र सांगण्यासह विवाहातील अपप्रकारांवर बोट ठेवतांनाच विवाह आदर्शरीत्या कसा संपन्न करावा, याचे दिशादर्शन केले आहे. लहान-लहान कृतींद्वारे विवाहाला 'धर्मप्रबोधक उपक्रम' कसे बनवू शकतो, हेही या लघुग्रंथावरून लक्षात येईल.

सध्या विवाहसंस्काराच्या मूळ उद्देशालाच हरताळ फासणाऱ्या शासन / न्यायसंस्था यांच्या निर्णयांमुळे कुटुंबसंस्थाच नष्ट होण्याचा धोका कसा निर्माण झाला आहे आणि त्याविरोधात हिंदूंनी काय केले पाहिजे, याचेही मार्गदर्शन या लघुग्रंथात केले आहे.

हा लघुग्रंथ वाचून सर्व जण विवाहाकडे 'धार्मिक संस्कार', या भावाने पाहोत अन् विवाह सोहळ्याचे पावित्र्य राखोत, ही श्री गुरुचरणी प्रार्थना ! – **संकलक.**